# 4.8 दर्जेदार शालेय शिक्षणासाठी 'व्हर्च्युअल स्कूल आणि लर्निंग होम' (2009)

**लेखक:** राम ताकवले, अध्यक्ष, इंडीयन कन्सॉर्शियम फॉर एज्युकेशनल ट्रान्स्फॉर्मेशन – आय् कन्सेंट

शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची गरज आज सर्वांनाच वाटत आहे. महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाची प्रणाली खूप मोठी आहे – ८९ हजार शाळा (पैकी १६ हजार माध्यमिक शाळा) ४.६९ लक्ष शिक्षक (पैकी १.५४ लक्ष माध्यमिक शिक्षक) आणि १७२ लक्ष विद्यार्थी (पैकी ५८.८ लक्ष माध्यमिक विद्यार्थी) याशिवाय खाजगी शिकवण्या करणारे शिक्षक, प्राथमिक व माध्यमिक शाळा समित्यांचे सदस्य आणि मुलाचा नियमित अभ्यास घेणारे पालक या सर्वांचा सहभाग धरल्यास शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्रातील २० टक्के जनता यात सामिल झालेली आहे.

## सर्वांना दर्जेदार शिक्षणाची गरज :

सर्वांसाठी शिक्षण हे धोरण आतापर्यंत शासनातर्फे राबवले जात आहे. परंतु २१ व्या शतकातील माहिती-तंत्रज्ञानामुळे एक नवीन जोडलला समाज (Connected Society) निर्माण होत आहे.

जागतिकीकरणामुळे प्रचंड बदल वेगाने घडत आहेत. कामाची विविधता व संधी वाढत आहे. आजच्या युवकांना कामासाठी जागतिक स्पर्धेत उतरावे लागते. स्वतःच्या ज्ञान, कौशल्ये आणि कार्यकुशलतेच्या आधारावरच त्यांना चांगली कामे मिळतात. या नव्या जगात नवनिर्माण आणि सर्जनशीलतेवर खूप भर दिला जात आहे. नव्या जोडलेल्या समाजात एक ज्ञानाधिष्ठीत अर्थव्यवस्था निर्माण होत आहे. अशा वेळी शिक्षणच नव्हे तर दर्जेदार शिक्षण सर्वांना मिळणे गरजेचे झाले आहे.

आज खाजगीकरणातून हा दर्जाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न होत आहे. त्यासाठी खाजगी शाळातून प्रचंड फी आकारण्यात येत आहे. त्यातून भारतीय समाजात अगोदरच असलेली विषमता वाढीस लागली असून समाजातील विविध स्तरांमध्ये स्पर्धा व तणाव वाढत आहेत.

## व्हर्च्युअल स्कूल आणि लर्निंग होम

दर्जेदार शालेय शिक्षण सर्वांना सर्वत्र दिले गेले तर अनेक प्रश्न सोडवण्याचे मार्ग सापडतील. नेहमीच्या मार्गाने हे साधणे जवळजवळ अशक्य आहे. म्हणूनच नवे मार्ग नव्या दिशा शोधण्यासाठी १५ संस्थांनी एकत्र येऊन इंडीयन कन्सॉर्शियम फॉर एज्युकेशनल ट्रान्स्फॉर्मेशन – आय् कन्सेंट हा संस्था समूह तयार केला आणि २-३ वर्षांच्या परिश्रमातून शिक्षक प्रशिक्षण आणि शालेय शिक्षणाचे कार्यक्रम विकसीत केले. त्यांतील एक 'व्हर्च्यूअल स्कूल आणि लर्निंग होम' हा कार्यक्रम असून तो मोठया तंत्र-शैक्षणिक (Techno-education) प्रणालीवर आधारलेला आहे. या प्रणालीत खालील मुख्य कार्यक्रम आहेत.

**१) प्रयोग परिवार केंद्र (PPK – Prayog Parivar Kendra):** यामध्ये विद्यार्थ्यांना प्रयोगातून विज्ञान, कृतीतून शिक्षण आणि दर्जेदार शिक्षण स्त्रोतांचा वापर करण्याची संधी देण्यात येते. पुणे जिल्ह्यांत १५ तालुका

केंद्रांतून या कार्यक्रमाची सुरूवात झाली असून येत्या वर्षात ७५० केंद्रे महाराष्ट्रात तयार व्हावीत ही योजना आहे.

**२) उत्तमता व प्रज्ञा संवर्धन (NET-Nurturing Excellence & Talent) :** या विभागातर्फे शालेय ऑलिंपियाड ही संकल्पना विकसीत केली आहे. यामध्ये (दर वर्षी) संवर्धनांचे तीन कार्यक्रम, तीन पातळयांवर राबवण्यात येतील. प्रत्येक संवर्धन कार्यक्रमानंतर परीक्षा घेण्यात येईल. ही परीक्षा पाठांतरावर आधारित न राहता विचार व कौशल्यांच्या आधारे सोडवावी लागणार आहे. पहिल्या परिक्षेस ७ वी ते १० वी या इयत्तेतील सर्व विद्यार्थी बसू शकतात(लोक परिक्षा). दुस-या परिक्षेस पहिल्या टप्प्यातील यशस्वी विद्यार्थी बसू शकतात (वर्ग परिक्षा). तिस-या परिक्षेस गुणवत्तेनुसार पहिल्या १०% विद्यार्थ्यांनाच बसता येते. महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (एम्. के. सी. एल्.) चे नेटवर्क, वितरित वर्ग (Distributed Classroom) आणि NET चे संकेतस्थळ (वेबसाईट) यांचा वापर करून महाराष्ट्रातील उत्तमोत्तम शिक्षकांच्या शिकवण्याचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना पूर्ण महाराष्ट्रभर मिळणार आहे. या कार्यक्रमाअंतर्गत माध्यमिक विज्ञान ऑलिंपियाडचे एक आवर्तन २००७-०८ या साली पूर्ण करण्यात आले असून दुसरे आवर्तन यावर्षी सुरू होत आहे. मागील बॅचचे ८ विद्यार्थी आंतरराष्ट्रीय ज्युनियर सायन्स ऑलिंपियाडच्या ट्रेनींग कॅंपसाठी निवडले गेले व त्यातील एका विद्यार्थ्याची राष्ट्रीय संघात डिसेंबर २००८ साली, सेऊल (दक्षिण कोरीया) येथे होणा-या आंतरराष्ट्रीय ज्युनियर विज्ञान ऑलिंपियाडसाठी निवड झाली आहे.

मागील वर्षीच्या ७५०० विद्यार्थ्यांतून ४३५ विद्यार्थी तिस-या परिक्षेस बसले. त्यापैकी ३५ उत्तम विद्यार्थ्यांना ऑलिंपियाड पध्दतीने मेडल्स, पारितोषिक आणि फेलोशीप देऊन गौरविण्यात आले.

अशाच त-हेची शालेय ऑलिंपियाड स्पर्धा माध्यमिक (१०वी) व प्राथमिक (८वी) स्तरांवरील इतर सर्व विषयांना सुरू करण्याचा आमचा संकल्प आहे.

**३) मुक्त शिक्षण स्त्रोत (OER – Open Education Resources):** या कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षक-पालकांच्यासाठी चर्चामंडळ (फोरम) सुरू करण्यात येत आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी तुमचा प्रश्न विचारा, हे करून बघा, आपल्या भेटीस – हे उपक्रम आहेत. तर पालक-शिक्षकांच्या चर्चामंडळामध्ये आपल्या पाल्ल्याची बुध्दिमत्ता, तिचे संगोपन, सुयोग्य विद्यार्थी निहाय शिक्षण कोणते इ. अनेक प्रश्नांवर चर्चा व व्याख्याने होणार आहेत.
लवकरच शिक्षक - पालक प्रशिक्षणाचा कार्यक्रम आम्ही सर्वांसाठी उपलब्ध करून देत आहोत. तसेच प्रायमरी स्कूल ऑलिंपियाडची सुरूवातही करणार आहोत.

आय्-कन्सेंट या कन्सॉर्शिअम मध्ये होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र (मुंबई), एम्. के. सी. एल्., नेत्रा इ. संस्था सामील झालेल्या आहेत. कार्य आणि कक्षा रूंदावेल तसतशा अनेक शैक्षणिक संस्था यात सामील होणार आहेत. एम्. के. सी. एल्.चे नेटवर्क, इ-प्रशासन, इ-शिक्षण या तंत्रज्ञानाच्या प्रणालीमुळे उत्कृष्ट दर्जाचे शालेय शिक्षण महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्ति, कुटुंब, केंद्र, शाळा इ. ठिकाणी समतेने व समानतेने आपण पोहोचवू शकणार आहोत. या विविध उपक्रमातूनच एक मोठी तंत्र-शैक्षणिक पध्दती (Techno-Educational System) विकसित करण्यामध्ये आम्हास यश मिळणार आहे.

## विकासाच्या दोन दिशा :

व्हर्च्युअल स्कूल आणि लर्निंग होम या कार्यक्रमांतर्गत वर दिलेले उपक्रम विकसित होत आहेत. या विकासाची एक दिशा म्हणजे सार्वजनिक व खाजगी संस्थांचे सहकार्य – परस्परांचे यश साधण्यासाठी 'विन-विन' पद्धत, एम्. के. सी. एल्. चे नेटवर्क आणि शैक्षणिक संस्थांची तज्ञता वापरून स्वावलंबी, आत्मनिर्भर पध्दती विकसित करावयाची हे धोरण निश्चित झाले आहे. ती कमीत कमी खर्चात सर्वांना पोहोचावी हा उद्देश आहे. शासनाच्या आणि समाजाच्या मदतीतून जो काही आषय-कन्टेंट (Content) निर्माण होईल तो सर्वांना मोफत असेल. पण त्याच बरोबर काही व्यक्तिंचा चरितार्थ, या उपक्रमात व कार्यक्रमात ते करीत असलेल्या कामावर अवलंबून आहे. यासाठी एखाद्या व्यावसायीक प्रारूपाची (Business Model) आवश्यकता आहे. म्हणून आम्ही 'आषय मोफत; परंतु सेवेसाठी फी' हे तत्त्व धोरण म्हणून विकसित करू इच्छितो. या मुक्त आणि मोफत आषयासाठीही शासनाची व समाजाची मदत हवी आहे. आमच्या कन्सॉर्शिअम मधील बहुसंख्य संस्था 'ना-नफा' या तत्वावर काम करीत आहेत.

एम्. के. सी. एल्. चे तंत्रज्ञानाचे नेटवर्क हा या कार्याला लागणारा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यामध्ये काम करणा-या खाजगी आणि सार्वजनीक संस्था आणि व्यक्ति यांचे **एक केंद्रीय नेटवर्क** तयार होत आहे. या कार्यक्रमांतून फायदा मिळणारा स्थानिक स्तरावरील विद्यार्थी, पालक, शिक्षक व शाळा हा या प्रकल्पातील दुसरा महत्त्वाचा भाग आहे. त्यांचेही नेटवर्क होणे गरजेचे आहे. या प्रकल्पाचे फायदे सर्वदूर नेण्यासाठी पालकांचे नेटवर्क निर्माण करणे आणि दोन्ही नेटवर्कनी सहकार्याने (विन-विन पध्दतीने) काम करणे हा आजच्या परिस्थितीत एक चांगला मार्ग होऊ शकेल. इथे 'पालक' हा शब्द व्यापक अर्थाने घेतला असून दर्जेदार शालेय शिक्षण सर्वांना, सर्वत्र मिळावे असे वाटणा-या सर्वांनी महाराष्ट्रातील सर्व शालेय विद्यार्थ्यांचे पालकत्व स्विकारले पाहिजे आणि आपला सहभाग दिला पाहिजे. हा सहभाग पैसा, सेवा, काम, बौध्दिक आणि तांत्रिक सहभाग इ. अनेक मार्गाने देता येईल. मोठया वर्गात विद्यार्थ्यांकडे व्यक्तीगत लक्ष दिले जाऊ शकत नाही. खाजगी शिकवणीत असे लक्ष दिले जाऊ शकते असे सर्व शिक्षक या उपक्रमांचा भाग होऊ शकतात. त्यांची संख्या सुमारे पाच लाख आहे. त्या सर्वांना व्हर्च्युअल स्कूलच्या या कार्यक्रमात सहभागी होता येईल.

## महा प्रज्ञा अभियान : पालक-शिक्षक सहभागासाठी

या अभियानाचा उद्देश 'दर्जेदार शिक्षण – सर्वांना, सर्वत्र' मिळवून देणे, हा असून महाराष्ट्रात ही एक लोक चळवळ व्हावी अशी आमची धडपड आहे. ही चळवळ- अभियान संघटीत व्हावे व यातून पालकांचे एक नेटवर्क निर्माण व्हावे आणि शिक्षण समानतेने, आर्थिक व सामाजिक न्यायाने सर्वांना मिळावे हे आमचे ध्येय आहे. यासाठी विद्यार्थ्यांना शालेय ऑलिंपियाड मध्ये सहभागी करून घेण्यासाठी सध्या तीन मार्ग निवडले आहेत.

१) अभियान फेलो (School Olympiad Movement Fellow) चा विद्यार्थी गट (५ विद्यार्थी)
२) पालकांचा विद्यार्थी गट (किमान १० विद्यार्थी)
३) शिक्षकांचा विद्यार्थी गट (किमान १० विद्यार्थी)

पालक, शिक्षक व हुशार विद्यार्थी यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, पालक-शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या बहुविध बुध्दिमत्ता निरखाव्यात व त्यांच्या प्रज्ञेचा विकास करावा. त्यासाठी व्हर्च्युअल स्कूल मधून सर्वप्रकारचे सहकार्य व मदत आम्ही देणार आहोत.

महा प्रज्ञा अभियान फेलोला एम्. के. सी. एल्. ५००० रू. फेलोशिप देणार असून त्याने आपल्या पालकांच्या मदतीने पाच विद्यार्थ्यांच्या बरोबर अभ्यास करून त्यांना सर्वात वरच्या पातळीवर जाण्यासाठी मदत करावयाची आहे. यासाठी NET चे संवर्धनाचे कार्यक्रम व OER चे अध्ययन सहाय्य घ्यावयाचे आहे. पालक आणि शिक्षकांच्या कडूनही हीच अपेक्षा आहे. खाजगी शिक्षक स्थानिक पातळीवर काही अर्थार्जनही करू शकतात.

शालेय ऑलिंपियाडमध्ये सामील होणा-या विद्यार्थ्यांच्या सुस्थितीत असणा-या पालकांनी आपल्या पाल्ल्याबरोबर आणखी एकतरी गरीब विद्यार्थ्याची फी भरावी, ज्यांना शक्य असेल त्यांनी अनेक विद्यार्थ्यांची फी भरण्यासाठी अर्थसहाय्य करावे. हे सर्व स्थानिक पातळीवर होणे अवश्यक आहे. कोणास व किती मदत दिली हे त्या दात्यास कळवण्याची सोयही करण्यात येईल, राज्यपातळीवरही अनेकांकडून ही मदत अपेक्षित आहे. या अभियांनात सहभागी होणा-या पालक, शिक्षक, शाळा, संस्था, एम्. के. सी. एल्. ची अधिकृत प्रशिक्षण केंद्रे यांनी जे प्रसाराचे व दर्जा उंचावण्याचे कार्य यशस्वीपणे केले त्यांचा दरवर्षी सत्कार व त्यांच्या कार्यास मदतीसाठी पारितोषिके देण्याचा विचार आहे.

सर्वानांच या अभियानात सहभागी होता येईल. या महा प्रज्ञा अभियानाची जेव्हा लोक चळवळ होईल, मोठया तंत्र-शैक्षणिक पध्दतीतील तंत्र-शिक्षण नेटवर्क व पालक नेटवर्क एकत्रीत काम करावयास लागतील, तेव्हाच दर्जेदार शिक्षण महाराष्ट्रातल्या १७२ लक्ष विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू शकेल.